भारत शिक्षण संस्था संचालित,

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,

## उमरगा जि. उस्मानाबाद

(संलग्नित: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर अहवाल

## "स्वच्छता व जल संवर्धनासाठी युवा"

### मौजे तलमोड ता. उमरगा

### दि. १७/१२/२०१८ ते २३/१२/२०१८

## २०१८-२०१९

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित उपक्रम अहवाल - २०१८-१९

### प्रस्तावना

महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्य संवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने. म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरु, माजी शिक्षण मंत्री डॉ.व्ही.के.आर राव यांच्या प्रेरणा व दृष्ट्या नेतृत्वातून २४ सप्टेंबर १९६९ ला राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबीरातून स्वंयसेवकामध्ये श्रमदान, संवाद, संघटन, नेतृत्व, कौशल्य विकास, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या हेतूने प्रत्येक स्वंयसेवकाला विविध कार्याचे वाटप करून स्वत:ला घडण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. शिबीराच्या माध्यमातून सांयकाळी विविध सामाजिक विषयावर पथनाट्य, एकांकिका, नाटक, काव्यवाचन, कथा-कथन आदि सांस्कृतिक कार्यक्रमातून ग्रामीण भागांतील नागरिकांचे उद्बोधन व मनोरंजन केले जाते.

आजचे महाविद्यालयीन युवक उद्याचे आधारस्तंभ आहेत. या स्वंयसेवकामधूनच उद्याचे शास्त्रज्ञ,अभियंते, शिक्षणतज्ञ, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, विचारवंत, व्यावसायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, साहित्यिक सुजाण आदर्श नागरिक निर्माण होणार आहेत. म्हणूनच राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वाची आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फक्त वर्ग खोल्यांमध्येच शिक्षण न घेता समाजामध्ये जाऊन लोकांच्या सोबत राहून, त्यांच्या प्रश्नांना समजून घ्यावे, त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्यवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी व यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रमंसोबातच मौजे तलमोड ता. उमरगा येथे सात दिवसीय **“स्वच्छता व जल संवर्धनासाठी युवा”** विशेष निवासी शिबीर आयोजित केले. या विशेष शिबिरात १५० स्वयंसेवकांनी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी व डॉ. मनोरंजना निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरातील नियोजित दिनचर्येनुसार नुसार सर्व कार्यक्रमात सहभागी होवून सदर शिबीर यशस्वी केले.

शिबिराची दिनचर्या खाली प्रमाणे होती-

| | |
|---|---|
| स. ५.३० ते ७.३० | योग, प्राणायाम व कवायती |
| स. ७.३० ते ८.३० | अल्पोपहार व चहापान |
| स. ८.३० ते १.०० | श्रमदान |
| दु. १.०० ते २.३० | स्नान व भोजन |
| दु. २.३० ते ३.०० | विश्रांती |
| दु. ३.०० ते ४.०० | बौद्धिक गटचर्चा |
| सा. ४.०० ते ५.३० | व्याख्यान |
| सा. ५.३० ते ७.०० | मनोरंजनात्मक खेळ |
| सा. ७.०० ते ८.०० | भोजन |
| रा. ८.०० ते १०.०० | सांस्कृतिक कार्यक्रम / विविध गुणदर्शन |

शिबिरामध्ये प्रामुख्याने स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जल संधारणाची कामे, नाली सरळीकरण, अंतर्गत रस्ते निमिती व स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण जनजागरण मोहीम, आदि उपक्रमांतून समाजामध्ये जाणीव जागृती करण्याचे कार्य रासेयोच्या स्वयंसेवकांनी केले. शिबिरादरम्यान राबवण्यात आलेल्या सर्व कृती कार्यक्रमांचा विस्तृत अहवाल पुढे सादर करीत आहे.

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा पहिला दिवस : शिबिराचे उद्घाटन

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे "स्वच्छता व जलसंवर्धन साठी विशेष युवा शिबिर" याचे मौजे तलमोड येथे आज दिनांक १७/१२/२०१८ रोजी सुरवात झाली. "राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करून त्यांना मदतीचा हात द्यावा. गावाच्या विकासात सहकार्य करावे" असे आवाहन निवासी शिबिराचे उद्घाटन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मा. अमोल (भैया) मोरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून मा. श्रीमती सारिका लोकरे, कृषी अधिकारी, पंचायत समिती उमरगा या होत्या. "भारत हा कृषिप्रधान देश आहे. जलसंवर्धन शेती व्यवसायास संजीवनी देते. गावाच्या विकासात शेतीपूरक उपकरणांचा सुयोग्य वापर केल्यास वेळ, इंधन व मानवीय ऊर्जेचा चांगला उपयोग होईल" असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ सुभाष वाघमोडे, (संचालक भारत शिक्षण संस्था, उमरगा). यांनी युवक कसा असावा हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे देऊन स्वयंसेवकांना प्रेरित केले. उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनीही यावेळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, मा. श्री दिगंबर बिराजदार (संचालक, भारत शिक्षण संस्था, उमरगा), उपप्राचार्य डी. वी. थोरे, सौ. मनिषा राजेंद्र सुगिरे (सरपंच, ग्रामपंचायत तलमोड), श्री माधव गणपती शिंदे (उपसरपंच),श्री एस एस कांबळे (ग्रामविकास अधिकारी), श्री दगडू कालिदास मोरे (माजी उपसभापती पंचायत समिती उमरगा), श्री दत्तू जाधव (अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त समिती), श्री बालाजी मोरे (माजी उपसरपंच), श्री अशोक दादाराव मोरे, श्री सुभाष मोरे, श्री पवन महारुद्र स्वामी (पोलीस पाटील), तलमोड गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी यासोबतच कार्यक्रमाधिकारी डॉ.व्हि. डी. देवरकर, प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करें, प्रा. एम डबलू. व्हनाळे, मुरलीधर जाधव, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाधिकारी डॉ. वी. डी. देवरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्. एम. खराडे यांनी केले तर डॉ. सी डी करे यांनी आभार मानले

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: दुसरा दिवस

शिबिराच्या नियोजित दिनचर्या नुसार सकाळी साडेपाच ते साडेसात दरम्यान सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा राजेंद्र सूर्यवंशी प्रा डॉ विनोद देवरकर प्रा डी डी पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहार आनंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी कार्यालय परिसर व ग्रामपंचायत कार्यालय परिसर यामध्ये स्वच्छता अभियान राबवले. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतर च्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चेमध्ये भाग घेतला. बौद्धिक गट चर्चेसाठी त्यांना जल प्रदूषण व त्यावरील उपाय हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गटचर्चा नंतर असा निष्कर्ष काढण्यात आला की, जलप्रदूषण टाळण्यासाठी ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे गरजेचे आहे. या संबंधात रॅली काढून ग्रामस्थांचे घोषवाक्य व घोषवाक्य फलकांच्या माध्यमातून प्रबोधन करणे आवश्यक आहे.

बौद्धिक गटचर्चा नंतर डॉ एस एन अस्वले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास यावर व्याख्यान दिले…रायला ह्या रोटरीच्या उपक्रमांतर्गत यशस्वी होण्याचे सूत्र स्वयंसेवकांना समजून सांगितले. या प्रसंगी प्रा डी व्ही थोरे हे अध्यक्षस्थानी होते तर श्री राहुल सुभाष राव मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

व्याख्यानानंतर मनोरंजनात्मक खेळ प्राध्यापक भरत शेळके, प्रा. ए डी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

सायंकाळच्या भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रा. मुरलीधर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता चुटकुले आणि गीत गायन यामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रवीण गायकवाड यांनी केले.

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: तिसरा दिवस

शिबिराच्या नियोजित दिनचर्या नुसार सकाळी साडेपाच ते साडेसात दरम्यान सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा एस डी शिंदे, प्रा डी डी पांढरे व डॉ. ए डी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यालययामध्ये स्वच्छता अभियान राबवले. यामध्ये परिसरातील प्लास्टिक बॅग्स, तण व झाडांचे निगा राखण्यासाठी, पाणी व्यवस्थापन आदी, कामे केलीत. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतर च्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चेमध्ये सक्रिय भाग घेतला. बौद्धिक गट चर्चेसाठी त्यांना "भ्रष्टाचार व उपाय" हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गटचर्चा नंतर स्वयंसेवकांनी लाच घेणार नाही व देणारही नाही, नैतिक व्यवहार करणार व भ्रष्टाचारास खतपाणी घालणाऱ्या व्यक्तीस प्रतिबंध करेल असा निर्णय केला.

बौद्धिक गटचर्चा नंतर डॉ पद्माकर पिटले "जलसंवर्धनमध्ये युवकांची भूमिका" यावर व्याख्यान दिले. जगामध्ये पाण्याचा पिण्यायोग्य साठा ह फक्त ३% आहे. ते ही फक्त पावसाच्या माध्यमातून ते आपल्याला मिळते. पावसाचे प्रमाण वाढवायचे असेल तर तर वृक्षारोपण करावे लागेल असे प्रतिपादन त्यांनी केले. "श्रमदानातून श्रमप्रतिष्ठा निर्माण होते. स्वयंसेवकांनी न लाजता समाजासाठी कार्य करावे" असे मत या प्रसंगी डॉ. अजित आष्टे यांनी अध्यक्षीय समारोपात केले. श्री माधव गणपती शिंदे यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

व्याख्यानानंतर मनोरंजनात्मक खेळ प्रा. आर. एम खराडे, प्रा. डॉ. पी. के. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

सायंकाळच्या भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रा. एस डी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कविता चुटकुले आणि गीत गायन यामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मारुती व्हनाले यांनी केले तर राजेंद्र सूर्यवंशी यांनी आभार मानले.

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: चवथा दिवस

सकाळीच उठून सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा एस डी शिंदे, प्रा डी डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली तलमोड ग्राम पंचायत समोरील रस्ता सरळीकरण, स्वच्छता, जलव्यवस्थापन साठी नाली तयार करण्याचे काम श्रमदानातून केले. यामध्ये परिसरातील प्लास्टिक बॅग्स, तण व पाणी व्यवस्थापन

अंतर्गत नाली निर्मिती आदी, कामे केलीत. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

भोजनानंतर च्या विश्रांती नंतर स्वयंसेवकांनी बौद्धिक गटचर्चेमध्ये सक्रिय भाग घेतला. बौद्धिक गट चर्चेसाठी त्यांना "सुदृढ मनासाठी कला" हा विषय देण्यात आला होता. स्वयंसेवकांनी उत्साहात चर्चा पार पडली. या बौद्धिक गटचर्चा नंतर स्वयंसेवकांनी कला हा जीवनाचा अविभाज्य अंग असून एक तरी कला जोपासून त्याचा मानसिक वा सामजिक स्वास्थ वर्धनासाठी उपयोग केला पाहिजे असा निष्कर्ष काढला.

बौद्धिक गटचर्चा नंतर प्रा. एस ई बिराजदार यांनी "जलसंवर्धन काळाची गरज" यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. "जलसंवर्धन दैनंदिन कृतीतून केले पाहिजे. आपल्या सवयी पाण्याचा अपव्यय न करता त्याच्या जतन करणाऱ्या असाव्यात. कुपनलिका, विहिरी यांचे पुनर्भरण, संजीवन केले तर जलसाठा टिकवून ठेवण्यास मदत होईल, अन्यथा नजीकच्या भविष्यात मोठ्या पाणी संकटास सामोरे जावे लागेल असे प्रतिपादन त्यांनी केले. "स्वच्छता, स्वयंशासन, व संस्कृती जतन यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांचा अंगीकार केला पाहिजे" असे मत सोदाहरण व्यक्त याप्रसंगी प्रा एस टी दाडगे यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले. श्री संगमेश्वर कलशेट्टी यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

व्याख्यानानंतर स्वयंसेवक व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने प्रा. पी. डी पाटील, प्रा. मुरलीधर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गीत गायन , नृत्य या प्रकारात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ग्रामस्थांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ए डी देशमुख यांनी केले तर डॉ. पी. के. गायकवाड यांनी आभार मानले.

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: पाचवा दिवस

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा विनोद देवरकर, प्रा डी डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळा, तलमोड येथे अंतर्गत स्वच्छता, झाडांना आळे, तण काढून टाकण्याचे काम श्रमदानातून केले. यामध्ये परिसरातील प्लास्टिक बॅग्स, तण व पाणी व्यवस्थापन अंतर्गत नाली निर्मिती आदी, कामे केलीत.

यानंतर तलमोड गावात स्वच्छता यात्रा स्वयंसेवकांनी काढली.. अंतर्गत रस्ते, प्लास्टिक निर्मूलन, फळकांच्या माध्यमातून जलसंवर्धन जनजागृती करण्यात आली. तसेच स्वयंसेवकांनी हुंडाबळी, वृक्षतोड यावर पथनाट्यसादर करून ग्रामस्थांचे मनोरंजन व प्रबोधन केले. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

दुपारच्या भोजनानंतर महिला मेळावा व स्वसंरक्षण मार्गदर्शन घेण्यात आला. निसर्गाने स्त्री - पुरुष असा भेदभाव न ठेवता दोघांचीही क्षमतापूर्ण निर्मिती केली. मग एकास एक व दुसऱ्यास वेगळी वागणूक का? पती पत्नी संसाराची दोन चाके आहेत. त्यांचे समतोल राखणे गरजेचे आहे म्हणजे संसार सुखाचा

होईल. त्याचप्रमाणे मुलांनी मुलींकडे बघण्याचा दृष्टीकोन समतोल ठेवला तर स्त्री सक्षमकरणाची गरजच पडणार नाही. मुलींनीही बेडर पणे व्यक्त व्हायला शिकले पाहिजे असे मत अध्यक्षीय भाषणातून प्रा. बिना लोकरे यांनी व्यक्त केले.

यावेळी कु. रोहिणी बनसोडे, अध्यक्ष, स्वयंसिद्धा मराठवाडा प्रभाग या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. "मुलींना समाजात वावरताना अनेक संकटांना सामोरे जात शिक्षण, नोकरी, संसार करावा लागतो. त्यामध्ये त्यांचा मानसिक व प्रसंगी शारीरिक छळ केल्या जातो. त्यापासून बचाव व संरक्षण करण्यासाठी त्यांनी स्वयंसिद्ध झाले पाहिजे. प्रतिकार केला पाहिजे असे प्रतिपादन कू. बनसोडे यांनी केले. यावेळी मुलींनी स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. याप्रसंगी प्रा. हिना सय्यद यांनी "मी कोण आहे?" ही कविता सादर केली व प्रा. श्रीमती बकुळ कांबळे यांनीही स्वयंसेविकाना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शिवाजी विद्यालय, तलमोड चे विद्यार्थी, शिक्षकवृंद, कार्यक्रमाधिकारी प्रा राजेंद्र सूर्यवंशी, प्रा सुजित शिंदे, प्रा डी डी पांढरे, प्रा. आर एम खराडे, प्रा. सी डी करे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा मुरलीधर जाधव, प्रा ए डी देशमुख, प्रा. मारुती व्हणाळे व सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कू. प्रतीक्षा पाटील तर डॉ. आशा शिंदे यांनी आभार मानले.

## स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: सहावा दिवस

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा बी ए शेळके, प्रा एस डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. अल्पोपहारानंतर स्वयंसेवकांनी स्थानिक प्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली गावाच्या लगत असलेल्या डोंगराच्या पायथ्याला चर खोदण्याचे काम केले. यामुळे डोंगरमाथ्यावर पडलेल्या पावसाचे पाणी अडवून जीर्वल्या जाऊ शकते. नियोजित वेळेनुसार ठीक दोन वाजता स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी दुपारचे भोजन एकत्र बसून केले.

दुपारच्या भोजनानंतर ठीक ४.०० वाजता पशू चिकित्सा शिबीर घेण्यात आले. यावेळी डॉ. अनिल एम्पाळे यांनी गावकर्यांना पशुधन व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. गावाच्या विकासामध्ये शेती व्यवसाय व पशुधन व्यवस्थापनाचा महत्वाचा. वाटा असतो. छोट्या बालकापासून पंचविशीच्या तरुणांपर्यंत दुग्ध प्राशन हा बलवान व सुदृढ होण्यासाठी च्या आहाराचा प्रमुख घटक असतो. पशुधन तंदुरुस्त असल्यास त्याच्या मलमुत्राचा दुर्गंध येत नाही. त्यामुळे वायुप्रदूषण, जलप्रदूषण, घनकचरा व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होत नाहीत असे प्रतिपादन डॉ. अनिल यंपाळे, पशुधन पर्यवेक्षक, तलमोड यांनी केले.

याप्रसंगी शिवाजी विद्यालय, तलमोड चे विद्यार्थी, शिक्षकवृंद, कार्यक्रमाधिकारी प्रा राजेंद्र सूर्यवंशी, प्रा सुजित शिंदे, प्रा डी डी पांढरे, प्रा. आर एम खराडे, प्रा. सी डी करे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा मुरलीधर जाधव, प्रा ए डी देशमुख, प्रा. मारुती व्हणाळे व सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

# स्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवा: सातवा दिवस – शिबिराचा समारोप

सर्व स्वयंसेवकांनी योग प्राणायाम व कवायती कार्यक्रमाधिकारी प्रा बी ए शेळके, प्रा एस डी पांढरे व राजेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पूर्ण केला. सकाळच्या योगाभ्यास नन्तर निवासी शिबीर शाळा परिसरातच श्रमदान करून परिसर स्वच्छ केला..

सकाळच्या समारोपाच्या कार्यक्रमाची तयारी स्वयम्सेवकांनी केली. यावेळी प्रमुख अतिथी डॉ. रामकृष्ण कदम, उस्मानाबाद जिल्हा, गट समन्वयक उपस्थित होते. "राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमधून होणारे स्वयंसेवकांचे श्रमदान त्यांच्यावर श्रमसंस्कार हे घडवत असतात. ज्यामुळे त्यांच्या मधील आत्मविश्वास, सेवाभावी वृत्ती ही वृद्धिंगत होत असते. अशाच शिबिरांमधून देशाचा उत्तम नागरिक घडत असतो. बौद्धिक गटचर्चा व व्याख्यानांच्या माध्यमातून अनेक अनुभवी चिंतनशील व्याख्यात्यांचे जीवनानुभव स्वयंसेवकांच्या कानी पडत असतात ज्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध होत असते" असे मत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे गटसमन्वयक डॉ. राम कदम यांनी व्यक्त केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य प्रा. डी व्ही. थोरे उपस्थित होते.

"विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्तीचे बीजरोपण करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अनेकविध कार्यक्रम राबवले जात असतात. त्यापैकी अतिशय महत्वाचा शिबिराचा उपक्रम असतो. ही निवासी शिबिरे विद्यार्थ्यांवर संस्कार करतात व त्यांच्यात अमुलाग्र बदल घडवून आणतात. त्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने जगाकडे बघायला शिकवतात" असे प्रतिपादन डॉ. घनश्याम जाधव यांनी या वेळी केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे समन्वयक डॉ. टी. आर. पाटील यांनी दूरध्वनीवरून स्वयंसेवकांशी संवाद साधून "प्रत्यक्ष आयुष्यात जगतानाही 'नॉट मी, बट यू' चे तत्व अवलंबावे" असे सांगितले. उपप्राचार्य प्रा. डी. वी. थोरे यांनीही यावेळी स्वयंसेवकांसोबत संवाद साधला. तसेच रोहित गायकवाड, गौरव इगवे, विशाल सुर्गीरे व सुदर्शन लोमटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डी. वी. थोरे, डॉ. डी. पी. चव्हाण, प्रा. बी. जी.. बोटेवड, डॉ. संतोष कदम, तलमोड गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी यासोबतच कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हि. डी. देवरकर, प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करें, प्रा. मारुती व्हनाळे, प्रा. मुरलीधर जाधव, श्री अरविंद पाटील, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सी. डी. यांनी केले तर प्रा. आर. एम. खराडे यांनी आभार मानले.

# “स्वच्छता व जल संधारानासाठी युवा” – विशेष शिबिराचे उद्घाटन व बौद्धिक व्याख्याने





**उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी असलेल्या मा. अमोल (भैया) मोरे, डॉ. सुभाष वाघमोडे, श्री दिगंबर बिराजदार, डी. व्ही. थोरे, सौ. मनिषा सुगिरे, श्री दगडू मोरे, श्री दत्तू जाधव, श्री बालाजी मोरे, श्री अशोक मोरे, श्री सुभाष मोरे, श्री पवन स्वामी, आदि. शिबिराच्या उद्घाटक श्रीमती सारिका लोकरे, कृषी अधिकारी, पंचायत समिती उमरगा मार्गदर्शन करतांना.**



**‘राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास’ यावर डॉ एस एन अस्वले मार्गदर्शन करतांना.**



**‘राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास’ या बौद्धिक व्याख्यानाचा समारोप करतांना प्रा. डी व्ही. थोरे**



**श्री राहुल सुभाष राव मोरे आपले मनोगत व्यक्त करतांना**



**डॉ पद्माकर पिटले ‘जलसंवर्धनमध्ये युवकांची भूमिका’ या विषयावर व्याख्यान देतांना.**





बौद्धिक व्याख्यानांची गरज यावर मत प्रदर्शित करतांना प्रा. पी. डी. पाटील

‘जलसंवर्धन काळाची गरज’ यावर प्रा. एस ई बिराजदार अभ्यासपूर्ण व्याख्यान देतांना.





‘जलसंवर्धन काळाची गरज’ यावर प्रा. एस टी. दाडगे गांधीजीचे प्रयोग यावर विवेचन करतांना.

स्वसंरक्षण मार्गदर्शन कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या कु. रोहिणी बनसोडे मार्गदर्शन करतांना.





महिला मेळाव्याच्या आयोजनाची प्रस्तावना करतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मले

महिला मेळावा व स्वसंरक्षण मार्गदर्शन कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना प्रा. बकुल कांबळे





**महिला मेळावा व स्वसंरक्षण मार्गदर्शन कार्यशाळेत अध्यक्षीय भाषण करतांना प्रा. बीना लोकरे**

**महिला मेळावा व स्वसंरक्षण मार्गदर्शन कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना कु. रोहिणी बनसोडे**





**पशुधन चिकित्सा शिबिरात पशू आरोग्य तपासणी करतांना डॉ. यम्पाळे**

**पशुधन चिकित्सा शिबिरात पशू आरोग्य तपासणी करतांना डॉ. यम्पाळे**

## "स्वच्छता व जल संधारणासाठी युवा" – विशेष शिबिरातील कृती क्षणचित्रे








**दिनचर्येची सुरुवात योग-प्राणायाम व शारीरिक व्यायाम, कवयतींच्या माध्यमातून करतांना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी**




**सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता श्रमदानाच्या माध्यमातून करतांना स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी**



**परिसर स्वच्छतेपूर्वी**



**परिसर स्वच्छते नन्तर**




**परिसर स्वच्छतेपूर्वी**



**परिसर स्वच्छतेनन्तर**



**स्वच्छता जनजागरण या कार्यक्रमांतर्गत हळदी-कुंकू लावून निमंत्रण देतांना स्वयंसेविका**

**गाडगेबाबा जयंती निमित्ते ग्रामस्वच्छता करतांना स्वयंसेवक**





**स्वच्छता व जलसंधारणाची महती गावफेरीच्या माध्यमातून करताना स्वयंसेवक**

**सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता श्रमदानाच्या माध्यमातून करतांना स्वयंसेवक**






**परिसर स्वच्छतेनन्तर**

**पथनाट्य, एकपात्री, व कविता सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करतांना स्वयंसेवक**



पथनाट्य, एकपात्री, व कविता सादरीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करतांना स्वयंसेवक



शिबिरातली पंगत



डोंगर पायथ्यास पाणी अडवण्यासाठी चर खोदण्याच्या कामाची सुरवात करतांना डॉ. विनोद देवरकर



डोंगर पायथ्यास पाणी अडवण्यासाठी नैसर्गिक घळीवर वसंत बांध घालतांना स्वयंसेवक



डोंगर पायथ्यास पाणी अडवण्यासाठी चर खोदतांना स्वयंसेवक



डोंगर पायथ्यास पाणी अडवण्यासाठी खोलगट भागात खड्डे खोदतांना स्वयंसेवक




**रस्ते सरळीकरण व निर्मिती अंतर्गत रस्त्याचे काम करतांना स्वयंसेवक**






**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रासेयो गटसमन्वयक डॉ. राम कदम स्वयंसेवकांना समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे व कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर**

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**